दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.७ फेब्रुवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १६३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 7 Feburary 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 163 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून समज

**मुंबई–**मुंबईनंतर सर्वांचे लक्ष लागलेल्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत आज अखेर सत्तास्थापनेचा मुहूर्त लागला असून, महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडीवरून सुरू असलेले अंतर्गत नाराजीनाट्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तक्षेपामुळे संपुष्टात आले आहे. उपमहापौरपदासाठी पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या समर्थकांनी स्वतंत्र अर्ज भरण्याची तयारी दर्शवल्याने शिरसाट नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र एकनाथ शिंदे यांनी कडक शब्दात समज दिल्यानंतर शिरसाट समर्थकांनी माघार घेतली असून खुद्द शिरसाट यांनीही राजेंद्र जंजाळ यांची उमेदवारी मान्य केली आहे. परिणामी, आता शिवसेनेकडून अन्य कोणताही अर्ज भरला जाणार नसल्याने महापालिकेत सत्तास्थापनेचा मार्ग निर्विघ्नपणे मोकळा झाला आहे.महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले असून, महायुतीच्या जागावाटपानुसार भाजपकडून समीर राजूरकर यांनी महापौर पदासाठी, तर शिवसेनेकडून राजेंद्र जंजाळ यांनी उपमहापौर पदासाठी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे.

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण बंद झाले पाहिजे:देवेंद्र फडणवीसांनी सर्वांनाच खडसावले

## यातून राजकारण करण्याचा प्रयत्न दुर्दैवी–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. या संदर्भात होत असणारा वाद हा अतिशय निरर्थक आणि चुकीचा आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःच राजकारण यात कसं पाहता येईल, हा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. हे अतिशय चुकीचे आहे. शेवटी राज्याचे उपमुख्यमंत्री, राज्याचे अतिशय प्रसिद्ध व्यक्तिमत्व असणारे एक मोठे नेते, अजित दादा पवार हे दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले आहेत. त्यानंतर प्रत्येक व्यक्ती त्याच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. हे अतिशय चुकीचे आहे. अशा प्रकारचे खालचे राजकारण बंद झालं पाहिजे, असे ठाम मत देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.**



दैनिक वादळ वार्ता

**नागपूर । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय वादांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या दुर्दैवी घटनेतून काहीजण राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनतेत लोकप्रिय असलेले नेते अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे आरोप-प्रत्यारोप करणे अत्यंत चुकीचे असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. या घटनेतून राजकारण करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे. हे खालच्या पातळीचे राजकारण तात्काळ थांबले पाहिजे, असा कडक इशाराही त्यांनी दिला.मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा धावपट्टीजवळ भीषण अपघात झाला होता. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर काही व्हिडिओ समोर आले, ज्यामध्ये विमान कोसळल्यानंतर मोठे स्फोट झाल्याचे दिसत होते. या पार्श्वभूमीवर विविध तर्कवितर्क मांडले जाऊ लागले. तपासासाठी केंद्रीय पथक आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी पोहोचल्या असून, अपघाताचे कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी सुरू आहे.दरम्यान, या घटनेनंतर काही तासांतच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या शपथविधीवरूनही चर्चा रंगल्या. मात्र, फडणवीसांनी स्पष्ट केले की, या सर्व घडामोडींमध्ये अनावश्यक राजकीय अर्थ लावणे योग्य नाही. दु:खद प्रसंगात संयम राखणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# केज तालुक्यात शेतात मजुरी करण्यासाठी जात असलेल्या महिलेचा विनयभंग

## आरोपी विरुद्ध विनयभंगासह ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल;बचावासाठी महिलेने घेतला चावा

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

ऊस बांधणीसाठी शेतात जात असलेल्या एका विवाहित महिलेला रस्त्यात अडवून एकाने वाईट हेतुन तिच्याशी गैरवर्तन करून तिचा विनयभंग केला आहे. मात्र अन्यायाचा बदला घेण्यासाठी पीडित महिलेने त्या नराधमाला चावा घेतला. त्यामुळे त्याने तिला सोडून पळ काढला. या प्रकरणी त्या नराधमा विरुद्ध विनयभंगासह ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:१५ च्या सुमारास केज तालुक्यातील एक शेतमजूर महिला ही शेतात ऊस बांधणीसाठी रोजंदारीने काम करण्यास एकटीच पायी जात असताना त्या महिलेला एकाने रस्त्यात अडवून तिच्याशी झटापट करून त्याशी वाईट हेतुन गैरवर्तन करून तिचा विनयभंग केला. त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी महिलेने त्याच्या तोंडाला चावा



घेतला. त्यामुळे त्याने तिला सोडून पळ काढला. या प्रकाराची माहिती त्या महिलेने तिचे दीर आणि जाऊ आणि सासू यांना माहिती दिली. त्या नंतर त्यांनी केज पोलिस ठाणे गाठून दिलेल्या तक्रारी वरून तिच्याशी गैरवर्तन करून विनयभंग करणाऱ्या अजहर अशरफ पठाण याच्या विरुद्ध गु. र. नं. ५७/२०२६ भा. न्या. सं. ७४,११५(२) यासह ट्रॉसिटीचे कलम ३(१)(आर),३(१)(डब्ल्यू)(ळ), ३(१)(डब्ल्यू)(ळळ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

**आता गावात तोंड दाखवायला जागा नाही ! :–** नराधमाच्या तावडीतून सुटण्यासाठी महिलेने जबरदस्त प्रयत्न केला. त्याला प्रतिकार करीत असताना पिडीतेने त्या नराधमाच्या तोंडाला कडकडून चावा घेतल्याने तो जखमी झाला असल्याने आता त्याला गावात तोंड दाखवायला जागा उरली नाही.

**दोन वर्षा पासून महिलेचा पती बेपत्ता :–** पीडित महिलेचा पती दोन वर्षा पासून बेपत्ता आहे. त्या बाबत तो बेपत्ता असल्याची नोंद पोलिसात केलेली असून अद्याप पर्यंत तो आढळून आलेला नाही. त्यामुळे त्या नराधमाने तिच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला.

# म्हणे आम्ही पंडित असे म्हणून आधी हातचलाखी करुन खड्याचा रुद्राक्ष केला आणि नंतर अंगठी घेऊन पोबारा केला

## केज बस स्टँड वरून चमत्कार दाखवतो म्हणून दोघांनी अंगठी पळविली

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

मी नाशिकचा पंडित आहे. तुला चमत्कार दाखवतो असे म्हणून दोन अनोळखी इसमांनी संगनमत करून हातचलाखी करून खडा हातात देऊन त्याचा रुद्राक्ष करून दाखविला. त्या नंतर हातातील अंगठी एका कपड्यात ठेवायला लावून त्या अंगठीसह पोबारा केल्याचा प्रकार केज येथील बस स्टँडवर घडला.दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी ०८.०० वा. च्या सूमारास काशिदवाडी तालुका केज येथील भिमा सोनाजी जाधवर वय ५७ वर्ष हे पुण्याला जाण्यासाठी केज येथील बस स्टँडवर उभे असताना तिथे एक अनोळखी व्यक्त तिथे आला. त्या नंतर आणखी दुसरा एकजण तिथे आला आणि त्याला तो पाहिला व्यक्ती म्हणाला की, तो नाशिकचा पंडित आहे. तुझ्या काय अडीअडचणी आणि संकटे आहेत त्याचे निराकरण करतो त्या नंतर दुसऱ्या व्यक्तीने घरातील लग्न जमत नसल्याचे त्याची समस्या सांगितल्या नंतर स्वतःला पंडित म्हणविणाऱ्या अनोळखी व्यक्तीने तुम्हाला एक चमत्कार दाखवतो असे म्हणून एकाच्या हातात खडा दिला आणि तो खडा टाकून द्यायला सांगताच हातचलाखी दाखवून त्यातून एक रुद्राक्ष काढून दिला. त्या नंतर त्या पंडिताने भिमा जाधवर यांच्या हातातील ५ ग्रॅम वजनाची २४ हजार रु. किंमतीची अंगठी काढून ती एका गमजा मध्ये झाकून ठेवायला सांगून दहा मिनिटा नंतर उघडून बघ असे सांगितले. त्या नंतर भीमा जाधवर यांनी गमजा मध्ये ठेवलेली अंगठी पाहिली असता त्यांची अंगठी गायब झाली होती. तसेच त्याच वेळी ते दोन अनोळखी इसम देखील गायब झाल्याचे आढळून आले. त्या नंतर भीमा जाधवर यांनी ही माहिती केज पोलिस ठाण्यात दिली. त्या नंतर प्राथमिक तपास केल्या नंतर भीमा जाधववर यांच्या तक्रारी वरून दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दोन अज्ञात भामट्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु र नं ५५/२०२६ भा न्या सं ३०३(२),३१८,३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक राजू वाघमारे हे तपास करीत आहेत.

**भामटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असण्याची शक्यता ! :–** केज येथील बस स्टँड आणि परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित असल्याने अंगठी घेऊन पोबारा करणारे ते दोन भामटे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले असल्याची शक्यता आहे.

# लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष एकनाथ लाड अनंतात विलीन

## शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, नगरपरिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन अशा विविध पदावर कार्यरत असलेले गेवराई नगर परिषद पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ आप्पा लाड यांच्यावर दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. गेवराई नगर परिषदेमध्ये गेल्या २७ वर्षापासून कार्यरत असलेले पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ लाड यांचे अल्पशा आजाराने दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथे उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दहा वाजता गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत शांत, मनमिळावू आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती असल्याने एकनाथ लाड यांचा तालुक्यातच नव्हे तर जिल्हाभरात मोठा मित्र परिवार आहे. सर्व जाती,धर्मांना आणि गोरगरिबांना सोबत घेऊन चालत असल्याने आणि पाणीपुरवठा विभागातील आपली जबाबदारी प्रामाणिकपणे निभावत असल्याने गेवराई शहरातील ८० टक्के लोकांशी त्यांचा थेट संपर्क होता. त्यांच्या पत्नी कविताताई लाड या नुकत्याच नगरपालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. अंत्यसंस्काराच्या वेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, उपनगराध्यक्ष भगवानराव घुम्बार्डे, नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, नगरसेवक महेश सौंदरमल, भाजपा तालुका अध्यक्ष सचिन दाभाडे, शिवसेना माजी उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, गेवराई पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे, अमर लाड, एकनाथ लाड यांच्या पत्नी नगरसेविका कविताताई लाड, मुलगा प्रथमेश लाड, मुलगी प्राजक्ता लाड, यांच्यासह सर्व नगरसेवक, पत्रकार, नगर परिषदचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह गेवराई शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी जिंकली प्रेक्षकांची मने उपस्थितांनी दिली कौतुकाची थाप

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळा ही शहरातील नामांकित शाळा आहे.ही शाळा वर्षानुवर्ष संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य करीत आहे असे प्रतिपादन केजचे गट शिक्षणाधिकारी श्री. सुनिल केंद्रे यांनी केले. राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात उदघाटक म्हणून उपस्थित होते त्यावेळी ते बोलत होते.




स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित,राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.विद्यार्थ्यांनी रंगमंचावर आपले कलागुण सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्धाटन दिप प्रज्वलन व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले.यावेळी कार्यक्रमा साठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ड.श्री.राजेसाहेब देशमुख,उदघाटक म्हणून गटशिक्षणाधिकारी श्री. सुनिल केंद्रे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. दत्तात्रय चाटे,सामाजिक कार्यकर्ते श्री.हनुमंत भोसले,नगरसेवक श्री. बाळासाहेब गाढवे तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्था सचिव श्री.गदळे जी.बी,सह सचिव श्री. अशोकराव डांगे, कोषाध्यक्ष श्री.सय्यद नवाब साहेब,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.इतर उपस्थिती मध्ये ड.एस.बी.मस्के, शिक्षक सहकारी पत संस्थेचे संचालक अंबादास काळे,शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक श्री. डापकर एस.ए.व श्री. चौधरी बी.डी.यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम,राष्ट्रीय एकात्मता, पाण्याचे महत्व,अंधश्रद्धा निर्मूलन याबाबतचे गीत व अभिनय सादर करत सामाजिक संदेश दिला. सांस्कृतिक गीतातुन देशात विविध जाती, धर्माचे,पंथाचे लोक राहत असले तरीही राष्ट्रहिता साठी सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे असा संदेश दिला.महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा सांगणारे लोकगीत, लावणी,भक्ती गीत यांनी कार्यक्रम आणखीनच बहारदार केला. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्रमिक अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धा, उपक्रम,सांस्कृतिक कार्यक्रम या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात. भविष्यातील कलाकाराचा पाया इथेच घातला जातो यासाठी शाळेकडून अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्ही.बी.यांनी केले तर आभार श्री.गदळे जी.बी. यांनी मानले.सर्वश्री देशमुख ए.डी,क्षीरसागर, आर.एस, डिरंगे,जी.बी, मस्के जे.आर.श्रीमती गायकवाड ध्वजा,श्रीमती जाधव अनिता यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.उत्कृष्ट नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंद यांचे अभिनंदन केले.स्नेह संमेलनासाठी पालकांचा शेवटपर्यंत उदंड प्रतिसाद मिळाला.

# संपादकीय

## रेल्वेसाठी १४ हजार कोटींची तरतूद

मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे.यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्याला चांगलाच पावला. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. यामध्ये अहमदनगर–बीड–परळी तसेच जालना–जळगाव व नांदेड–वर्धा रेल्वे मार्गांचा समावेश आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी हे तीन रेल्वे मार्ग पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून हे रेल्वे प्रकल्प प्रलंबित असल्याने त्यावरील कामाचा खर्च दिवसेंदिवस वाढतच होता; परंतु केंद्रीय अर्थसंकल्पात या रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने आता मराठवाड्याच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. अहमदनगर–बीड – परळी या रेल्वे मार्गासाठी ४ हजार ९५७ कोटींची तरतूद करण्यात आली. जालना–जळगाव रेल्वे मार्गासाठी ५८०४ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. तसेच मराठवाडा व विदर्भाला जोडणारा नांदेड–वर्धा हा रेल्वे मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून पूर्ण झालेला नाही.या रेल्वे मार्गासाठी ३ हजार ४४५ कोटींची तरतूद या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली. या तिन्ही रेल्वे मार्गांच्या प्रलंबित कामांसाठी मराठवाड्यातून गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. मराठवाड्यातील खासदार या पाठपुराव्याला कमी पडल्यामुळेच आजपर्यंत या कामाला उशीर झाला. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे. २०१४ पासून नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान झाल्याने देशाचा समतोल विकास होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील मराठवाड्याच्या विकासाकडे विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच वारंवार आढावा घेत आहेत. प्रलंबित रेल्वे मार्गांच्या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागातील खासदारांना कामाला लावावे, अशी मागणी होत आहे. नांदेड–मनमाड मार्गावरील नांदेड–पुणे ही रेल्वे पुणेऐवजी हडपसरपर्यंत धावत आहे. नांदेडवरून दुपारी ३ वाजून पंधरा मिनिटांनी सुटणारी ही रेल्वे मनमाडमार्गे हडपसर येथे सकाळी ७.३० वाजता पोहोचत आहे. यामुळे पुणे शहर व पिंपरी–चिंचवड या भागात जाण्यासाठी प्रवाशांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे. विशेष म्हणजे २६ जानेवारीपासून हा बदल करण्यात आला. पूर्वी ही रेल्वे पुणे स्थानकापर्यंत धावत होती. त्यावेळी या रेल्वेसाठी तिकीटही मिळणे अवघड होते; परंतु आता ही रेल्वे मराठवाड्यातील प्रवाशांसाठी गैरसोयीची केल्याने केवळ ट्रॅव्हल्सवाल्यांचे फावत आहे. ज्या रेल्वे सेवेला चांगला प्रतिसाद असतो अशा रेल्वे सेवा अडगळीत टाकण्याचे प्रकार हल्ली वाढले आहे. सर्वसामान्य प्रवाशांना अशा बदलामुळे त्रास सहन करावा लागतो. याकडे लक्ष देण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने मराठवाड्यातून संताप व्यक्त केला जात आहे. नांदेड–पुणे या मार्गावर मराठवाड्यातील प्रवासी वंदे भारत रेल्वेसेवेची वाट पाहत आहेत. मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्यात स्थायिक आहेत. याचबरोबर नोकरीच्या निमित्ताने मराठवाड्यातील अनेकजण पुण्याला ये–जा करतात. विशेष म्हणजे मराठवाड्यातून पुण्याला हजारो ट्रॅव्हल्स दररोज धावत असतात. ट्रॅव्हल्स चालकांची लॉबी मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या रेल्वे सेवेला नेहमीच अडथळे आणतात, असा संताप मराठवाड्यातून नेहमीच व्यक्त होत असतो. मराठवाड्यातील खासदारांनी आपल्या ताकदीची एकजूट दाखवून नांदेड पुणे वंदे भारत सेवा सुरू करून दाखवावी, अशी मागणी मराठवाड्यातून गेल्या अनेक दिवसांपासून होत आहे. मराठवाडा व तेलंगणाला जोडणाऱ्या नांदेड–हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवा सुरू होणार असल्याचे तीन महिन्यांपूर्वीच काही खासदारांनी जाहीर केले होते; परंतु अद्यापपर्यंत नांदेड–हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवेचे कसलेही नियोजन झालेले नाही. या रेल्वेसेवेबाबत कसलाही निर्णय झालेला नसतानाच नांदेडमधील काही खासदारांनी याचे श्रेय घेऊन स्वतःची प्रसिद्धी करून घेतली.मराठवाड्यातील तीन महत्त्वाच्या प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाडा हा एक महत्त्वाचा औद्योगिक विकासाचा भाग म्हणून ओळखला जाणार आहे. ज्या भागात रेल्वे सेवा नव्हती, तिथपर्यंत रेल्वे सेवेचा विस्तार झाल्यास भविष्यात दळणवळण व वाहतुकीची सुविधा वाढणार आहे. एकीकडे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मराठवाडा, विदर्भ तसेच राज्यातील सर्व प्रमुख रस्ते चकाचक केल्यामुळे त्याचा फायदा औद्योगिक विकासासाठी होत आहे. यापुढे रेल्वेसेवेचा विस्तार झाल्यानंतर देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच बाहेर देशातूनही मराठवाड्यात औद्योगिक विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा केली जात आहे.यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्यातील रेल्वे सेवांच्या बाबतीत अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. या केंद्रीय अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाड्याचा मोठा कायापालट दिसून येणार आहे. कुठलेही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ठरावीक वेळेत ती कामे होणे महत्त्वाची असतात. याच दृष्टीने मराठवाड्यासाठी केलेली निधीची तरतूद योग्य वेळी केली गेली तर त्याचा फायदा नक्कीच मराठवाड्याच्या विकासासाठी होणार आहे, हे मात्र निश्चित.

# नवी मुंबईच्या महापौरपदी श्रीम.सुजाता पाटील व उपमहापौरपदी श्री.दशरथ भगत विराजमान



**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर – उपमहापौरपदासाठी आज झालेल्या निवडणूकीत श्रीम. सुजाता सुरज पाटील यांची महापौरपदी तसेच श्री. दशरथ सिताराम भगत यांची उपमहापौरपदी निवड झाल्याचे ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रणजित यादव यांनी पिठासन अधिकारी म्हणून जाहीर केले व त्यांचा अभिनंदनपर सत्कार केला. सभेच्या सुरवातीस महापालिका सचिव श्रीम.संघरत्ना खिल्लारे यांनी पीठासन अधिकारी यांचे स्वागत केले.महापौरपदासाठी दाखल झालेल्या अर्जातून नगरसेविका श्रीम. सरोज रोहिदास पाटील यांनी तसेच उपमहापौरपदासाठी दाखल झालेल्या अर्जातून नगरसेवक श्री. आकाश बाळकृष्ण मढवी यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने महापौर पदावर श्रीम. सुजाता सुरज पाटील व उपमहापौर पदावर श्री. दशरथ सिताराम भगत बिनविरोध निवडून आले.निवडणूकीनंतर महापौर व उपमहापौर पदाचे स्थानग्रहण केल्यानंतर प्रथमत: सभागृहाच्या वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.त्यानंतर मनोगत व्यक्त करतांना नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महापौर व उपमहापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.महापौर श्रीम. सुजाता सुरज पाटील यांनी स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण व वाहतूक नियोजन हे आपले प्राधान्यक्रम राहतील असे सांगितले. तरुणांना संधी, महिलांची सुरक्षा व सन्मान, ज्येष्ठ नागरिकांचा आदर व सर्वसामान्य माणसांना अपेक्षित असणाऱ्या सुविधा पुरविण्याचा आग्रही व प्रामाणिक प्रयत्न राहील असे त्या म्हणाल्या. वरिष्ठांनी सोपविलेली नवी मुंबईच्या महापौरपदाची संधी ही मोठी जबाबदारी मानून काम करणार असल्याचे सांगत सभागृहातील वरिष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन व सर्व सदस्यांचे सहकार्य यातून शिस्तप्रिय काम होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपली महापौरपदी निवड ही महिलांच्या समाजातील प्रगतीशील वाटचालीची साक्ष असल्याचे सांगत गृहिणी ते नगरसेविका व महिला व बालकल्याण समितीची सभापती नंतर आता महापौरपदाची लाभलेली संधी याबद्दल आनंद व्यक्त करतांनाच नवी मुंबईच्या गतीमान व सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द राहण्याचे व संवेदनशीलपणे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.उपमहापौर श्री. दशरथ भगत यांनी देशभरात नावलौकिक असणाऱ्या नवी मुंबईच्या अधिक गतीमान विकासासाठी उपमहापौरपद ही एक मोठी संधी असून त्यासाठी अथक व प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले. आगामी काळात नवी मुंबईकर नागरिकांना अपेक्षित असे चांगले काम सर्वांना सोबत घेऊन केले जाईल असा निर्धार व्यक्त करीत बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांनी सर्व सहयोगी सदस्यांचे आभार मानले.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे आणि इतर विभागाप्रमुख तसेच माजी खासदार श्री. संजीव नाईक, माजी आमदार श्री. संदीप नाईक आणि इतर मान्यवरांनी उपस्थित राहून नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर यांचे अभिनंदन केले.

# वडवणीत माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी होणार

**बीड । प्रतिनिधी**

ज्या महामानवाने भारतीय जनतेला संविधानाच्या माध्यमातून हक्क व अधिकार बहाल केले, त्या भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धांगिनी, त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी वडवणी येथे भिमनगरमध्ये मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे. अशी माहिती माता रमाई आंबेडकर जयंती उत्सव समिती, भीमनगर तसेच रमाई महिला मंडळ, पंचशील नगर, रमाई नगर व संविधान नगर, वडवणी यांच्या वतीने देण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वडवणीतील भीमनगर परिसरातील रणरागिणी महिलांनी या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ. वंदनाताई शेषेराव जगताप, माजी नगराध्यक्षा सौ. मंगलताई राजाभाऊ मुंडे, नगरसेविका सौ. किस्किंदा दिनकरराव आंधळे, नगरसेविका सौ. राणी सचिन सानप,माजी सभापती तथा नगरसेविका सौ.द्रौपती भगवान वाघमारे,नगरसेविका सौ. मिराबाई भीमराव उजगरे, सभापती सौ. उषाताई उत्तम घाडगे तसेच माजी नगरसेविका सौ. सरिताताई संजय उजगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमांची रूपरेषा :

शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६

सायंकाळी ५ ते ९ या वेळेत रमाई फेस्टिवल चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये महिला व लहान मुला–मुलींसाठी संगीत खुर्ची स्पर्धा, महिलांचे उखाणे यांसारखे कार्यक्रम होणार आहेत. प्रथम येणाऱ्या महिलांना माता रमाई व सावित्रीबाई



फुले यांचे चरित्र, तर लहान मुला–मुलींना शालेय साहित्य भेट देण्यात येणार आहे.

शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६

सकाळी ९ वाजता वडवणी पोलीस स्टेशनच्या एपीआय सौ. वर्षाताई व्हगाडे मॅडम यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता भव्य मिरवणूक निघणार असून ती भीमनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, टिपू सुलतान चौक, स्व. वसंतराव नाईक चौक, संविधान चौक, छत्रपती शाहू महाराज चौक, जीवा महाले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, पंचशील नगर, रमाई नगर व संविधान नगर या मार्गाने मार्गस्थ होणार आहे.

दुपारी २ वाजता भीमनगर येथे सामूहिक भोजनाचा कार्यक्रम होणार असून सायंकाळी ७ वाजता भीम–बुद्ध गीतांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तरी शहर, तालुका व पंचक्रोशीतील महिला–पुरुषांनी या सर्व कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक माता रमाई भीमराव आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंजली दमानियांवर कायदेशीर कारवाई करणार:रुपाली चाकणकरांचा थेट इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आज पत्रकार परिषद घेत माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या मृत्यूवरून शंका उपस्थित केली. तसेच त्यांनी पार्थ पवार यांच्यावर जमीन घोटाळ्यावरून देखील भाष्य केले. यावरून त्यांच्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी थेट कारवाईचा इशारा दिला आहे. अंजली दमानिया यांची आजची पत्रकार परिषद ऐकून समाजामध्ये किती खालच्या पातळीची विकृत असू शकते, अशी टीका चाकणकर यांनी केली आहे.रुपाली चाकणकर म्हणाल्या, अंजली दमानिया यांना अनेक कपोलो कल्पित कथा सांगायची सवय आहे. एखाद्या व्यक्तीला आणि एका कुटुंबाला अंजली दमानिया सातत्याने बदनाम करत असतात. यापूर्वी देखील अंजली दमानिया यांनी अजित पवारांवर अनेक आरोप केले, पण त्यातला कुठलाही आरोप त्या सिद्ध करू शकल्या नाहीत. आता त्या पार्थ पवार यांच्यावर आरोप करत आहेत. ही अतिशय घाणेरडी मानसिकता आहे, असे चाकणकर म्हणाल्या.



पुढे बोलताना रुपाली चाकणकर म्हणाल्या, खरेतर या कुटुंबीयांनी आपला घरातला माणूस गमावला आहे. अंजली दमानिया पुराव्या अभावी सातत्याने वक्तव्य करून चर्चेत राहत आहेत. ही अतिशय घाणेरडी मानसिकता आहे. अंजली दमानिया यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार असल्याचा इशारा चाकणकर यांनी केला आहे.

दरम्यान, आमदार अमोल मिटकरी यांनी देखील ट्विट करत अंजली दमानिया यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, अंजली दमानिया यांनी दुःखाच्या क्षणी केलेली विधाने अत्यंत दुर्दैवी आणि असंवेदनशील आहेत. माननीय अजितदादांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरलेला असताना, माध्यमांशी संवाद साधताना जाणीवपूर्वक संशय निर्माण करून वातावरण दूषित करण्याऐवजी, दुःखात सहभागी होणे अपेक्षित होते. तथ्यांशिवाय आरोप करणे हे ना माणुसकीला शोभते, ना जबाबदार सार्वजनिक भूमिकेला. आपल्या असंवेदनशीलतेचा निषेध व धिक्कार असल्याचे मिटकरी म्हणाले.

# दिव्यातील ग्लोबल इंग्लिश स्कूलचा वार्षिक क्रीडा मोहत्सव जल्लोषात संपन्न

**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा शहरातील ग्लोबल इंग्लिश स्कूलचा वार्षिक क्रीडा दिन दिनांक ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी रुणवाल माय सिटी येथील प्रशस्त फुटबॉल मैदानावर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या दोन दिवसीय क्रीडा महोत्सवात शाळेतील बालवाडीपासून माध्यमिक विभागापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. क्रीडा दिनामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली ऊर्जा, कौशल्ये व क्रीडावृत्ती यांचे प्रभावी दर्शन घडले.

सदर कार्यक्रमाची सुरुवात शिस्तबद्ध व देखण्या मार्च पास्टने झाली. विद्यार्थ्यांच्या ताठ मानेने, एकसमान पावलांनी आणि आत्मविश्वासाने केलेल्या संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर घेण्यात आलेल्या प्रेरणादायी मशाल दौडीने क्रीडा दिनाच्या उत्साहात अधिक भर घातली. पुढे



विद्यार्थ्यांनी क्रीडा शपथविधी घेऊन प्रामाणिकपणा, शिस्त आणि खिलाडू वृत्ती जपण्याचा संकल्प केला. यानंतर रंगीबेरंगी फुगे आकाशात सोडून क्रीडा दिनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या क्षणाने संपूर्ण मैदान आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेने भारावून गेले. या क्रीडा महोत्सवाला दोन दिवस मान्यवर प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणून मारुती गायकवाड (मुख्य अधिकारी, कुळगाव–बदलापूर महानगरपालिका) मा. नितीन पगार, पोलीस निरीक्षक, व सहायक पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर ( मुंब्रा पोलीस स्टेशन) यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि क्रीडाभावना अधिक दृढ झाली. प्रसंगी शाळेचे व्यवस्थापकीय संचालक महेंद्र दळवी तसेच प्राचार्या ज्योत्स्ना सोनी यांचीही मान्यवर म्हणून उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना क्रीडा व शिक्षण यांचा समतोल साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले. क्रीडा दिनाच्या निमित्ताने विविध वयोगटांसाठी धावण्याच्या शर्यती, मैदानी खेळ व इतर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये तंदुरुस्ती, सहकार्य, संघभावना आणि स्पर्धात्मकतेची सकारात्मक भावना विकसित झाली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनामुळे सर्व स्पर्धा शिस्तबद्ध व सुरक्षितपणे पार पडल्या. सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकता, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व ठळकपणे अधोरेखित झाले. ग्लोबल इंग्लिश स्कूलने अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली.

# हुतात्मा रविंद्र म्हात्रे अमर रहे ! घोषणांनी कन्नमवार दणाणून गेले

**मुंबई । प्रतिनिधी**

हुतात्मा रविंद्र म्हात्रे ज्यांनी काश्मिर भारताचा अविभाज्य भाग राहावा म्हणून आपल्या भारतासाठी हुतात्म स्वीकारले त्या थोर विरपुत्र ह्यांच्या ४२ वा स्मृतीदिन गुरुवार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी क्षात्रैक्य परिषद विक्रोळी ह्यांच्या वतीने विक्रोळी कन्नमवार नगरातील विकास हायस्कूल समोरील रविंद्र म्हात्रे मैदानात आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी त्यांना आदरांजली वाहण्यात आली.हुतात्मा रविंद्र म्हात्रे अमर रहे ! या घोषणांनी कन्नमवार दणाणून गेले.रविंद्र म्हात्रे यांच्या भगिनी शीला म्हात्रे व म्हात्रे कुटुंब आर्वजून उपस्थित होते. शिवसेना उबाठा उपविभाग प्रमुख शेखर जाधव,औंदुबर सराफ,लेखक मोहन अत्रे आदिंनी त्यांना आदरांजली वाहिली.शिवसेना उबाठा विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले,शाखाप्रमुख अभय राणे,माजी भाजप वॉर्ड अध्यक्ष प्रथमेश राणे, प्रभात मित्र मंडळाचे पदाधिकारी, एकविरा मंडळाचे पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, विकास हायस्कूल विद्यार्थी , नागरिक आदिंची उपस्थिती होती . विनय पाटील ह्यांनी प्रास्ताविक निवेदन केले . विकास हायस्कूल चे बॅन्ड पथक ह्यांनी मानवंदना दिली . युवा सई पाटील हीने हुतात्मा रविंद्र म्हात्रे ह्यांच्या विषयी माहिती दिली. गायक विनायक पेवेकर व त्यांच्या साथीदारांनी हुतात्मा म्हात्रे यांच्याविषयी गीत साजरे केले .या प्रेरणादायी कार्यक्रमामुळे युवा पिढीचे मनोबल वाढविले. आदरांजली कार्यक्रमासाठी क्षात्रैक्य परिषद विक्रोळीचे अध्यक्ष अशोक पाटील,सचिव विनय पाटील , खजिनदार सुजाता म्हात्रे,ट्रस्टी अविनाश घरत, पार्श्वनाथ म्हात्रे,अरविंद सावे , डॉ. राजेश वैद्य , प्रमोद वैद्य यांच्यासह पदाधिकारी संजय राणे , विनायक नाईक, नंदकुमार वर्तक, बाळकृष्ण पाटील ह्यांचे विशेष सहाय्य लाभले .हुतात्मा रविंद्र म्हात्रे यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी कन्नमवार नगरात आल्या होत्या या निमित्ताने आठवणींना उजाळा देण्यात आला.

# कामचुकार मंडळ अधिकाऱ्यांना निलंबित करा–विजय वाठोरे

# दलित पँथरचे हिमायतनगर तालुका अध्यक्ष विजय वाठोरे यांनी तहसीलदारांना दिले निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर | प्रतिनिधी**

तालुक्यातील सरसम सज्जा येथे मंडळ अधिकारी म्हणून कार्य करत असलेल्या मंडळ अधिकारी पवार मॅडम या कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयात हजर न राहता वेळेच्या आधीच घराला निघून जात असल्याचे निदर्शनास आले आहे. वरून सामान्य नागरिकांना कामासाठी आपल्या कार्यालयात अनेक चकरा मारायला भाग पाडत आहेत. सामान्य माणसाला सोडा पण पत्रकार बांधवांना सुद्धा कार्यालयीन वेळेत कार्यालयात काम करून देण्यासाठी भेटत नाहीत. या मंडळ अधिकाऱ्याबाबत अनेक तक्रारी सामान्य माणसाकडून होत होत्या. यासंबंधी दलित पँथरचे तालुका अध्यक्ष विजय वाठोरे यांनी हिमायतनगरच्या तहसीलदार सौ पल्लवी टेमकर यांना निवेदन देत या कामचुकार मंडळ अधिकारी यांना निलंबित करा अन्यथा लोकशाही मार्गाने पँथर स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

हिमायतनगर तालुक्यामध्ये अधिकारी लोकांवर कुणाचाही वचक राहिला नसून अनेक अधिकारी काम चुकार बनले आहेत. कधीही यायचे आणि कधीही जायचे हे सर्वांच्या अंगवळणी पडलेले आहे. कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयात उपस्थित न राहता गोरगरीब,सामान्य लोकांची कामे प्रलंबित ठेवण्याचा हातखंडा अनेक अधिकाऱ्यांचा असल्याचा निदर्शनास येतो. सामाजिक कार्यकर्ते विजय वाठोरे हे आपल्या एका कामानिमित्त सरसम मंडळाच्या मंडळ अधिकारी असलेल्या पवार मॅडम यांच्याकडे गेले होते.त्यांना मंडळ अधिकारी यांनी अमुक तमुख कागदपत्र आणा तेव्हा करतो.म्हणत १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस घोळवत ठेवले. शेवटी दिनांक २ फेब्रुवारी रोजी विजय वाठोरे हे मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयात साडेतीन ते चार च्या दरम्यान गेले असता मंडळ अधिकारी कार्यालयात हजर नव्हत्या. त्यांनी फोन करत कामाबद्दल विचारणा केली. पण मंडळ अधिकारी पवार मॅडम यांनी उडवा उडवीची उत्तरे देत मी आता घराकडे निघाले आहे. मला जायला गाडी नाही.तुम्ही गाडी करून देता का ? या भाषेत बोलत उत्तर दिले.नंतर त्या कागदपत्रांवर सही करण्यासाठी सुद्धा आल्या नाहीत. उलट कार्यालयातील कारकूनच सर्व कागदपत्रांवर शिक्के मारून सह्या करतो. ही बाब लक्षात आली. यामुळे दलित पँथर चे तालुका अध्यक्ष विजय वाठोरे यांनी हिमायतनगरच्या तहसीलदार सौ पल्लवी टेमकर मॅडम यांच्याकडे निवेदन देत या कामचुकार मंडळ अधिकारी यांना तात्काळ निलंबित करा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असे निवेदन दिले.

या निवेदनात विजय वाठोरे यांनी संबंधित मंडळ अधिकारी यांना निलंबित करा,तालुक्यातील श्रावण बाळ संजय गांधी निराधार योजना व इतर योजनेसाठी लागणारी २१००० चे उत्पन्न व लाभार्थ्यांची चौकशी करून निकषात असलेल्यांनाच योजनेचा लाभ द्यावा अन्यथा त्यांना योजनेतून बाद करण्यात यावे.अनेक बोगस लाभार्थ्यांना सह्या सिक्के देऊन योजनेमध्ये बोगस लाभार्थ्यांची भरती झाल्याची शंका निवेदनकर्त्यांना असल्यामुळे त्यांनी सदर बाबीची तात्काळ चौकशी करून याचा छडा लावावा.अश्या मागण्या केल्या आहेत.या कामचुकार मंडळ अधिकारी यांना निलंबित न केल्यास पँथर स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशाराही दलित पँथर चे हिमायतनगर तालुका अध्यक्ष विजय वाठोरे यांनी दिला आहे.




# कारला येथे महाविकास आघाडी उमेदवाराच्या प्रचारार्थ खा.ओमराजे निंबाळकर यांची कॉर्नर सभा

## कारला येथील प्रचार कॉर्नर सभेत खरोसा गटातील शेतकर्याच्या लेकरांना निवडुण दया विकासाची हमी मी घेतो खा.ओमराजे निंबाळकर यांचे प्रतिपादन

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा | प्रतिनिधी**

औसा तालुक्यात होउ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत खरोसा जिल्हा परीषद गटातील कारला येथील गणेशनाथ महाराज मठा शेजारी महाविकास आघाडी उमेदवाराच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा संपन्न झाली ,महाविकास आघाडीचे खरोसा जिल्हा परीषद गटातील अधिकृत उमेदवार तानाजीराव जाधव ,खरोसा पंचायत समितीचे उमेदवार शितलताई फावडे ,कारला पंचायत समितीचे उमेदवार विलास काळे यांच्या प्रचारार्थ खा.ओमराजे निंबाळकर यांची भव्य प्रचार सभा संपन्न झाली .

खरोसा जिल्हा परीषद गटाचे उमेदवार तानाजी जाधव यांनी गटातील अनेक लोकांची कामे केली आहेत ,व सर्वसामान्य शेतकरी



कुटुंबातील तानाजीरावांना जिल्हा परीषदेत काम करण्याची संधी दया त्यांच्याकडुन काम करुन घेण्याची जबाबदारी माझी असल्याच ओमराजे निंबाळकर यांनी सांगीतले ,

भारतीय जनता पक्षाने आयात उमेदवारांना उमेदवारी दिल्याने व पैसेवाले गुत्तेदार व सावकार लोकांना तिकीट वाटपात प्राधान्य दिल्याने प्रत्येक गटात सावकार व पैसेवाल्यांना निवडुण देउ नका अस खा.ओमराजे निंबाळकर यांनी सांगीतले

यावेळी खरोसा जिल्हा परीषद गटातील महाविकास आघाडीचे खरोसा जिल्हा परीषद गटातील उमेदवार तानाजी जाधव ,खरोसा पंचियत समिती उमेदवार शितल फावडे ,व कारला पंचायत समिती उमेदवार विलास काळे यांच्या समोरील मशाल व हात चिन्हाला मतदान करुन भरघोस प्रचंड बहुमताने विजयी करा अस आवाहन यावेळी करण्यात आले ,शिवसेना नेते बजरंज जाधव ,सुरेश भुरे , सह खरोसा जिल्हा परीषद गटातील पंचायत समिती कारला व खरोसा गणातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थीत होते.

# जुगार खेळणाऱ्या १० जणांना अटक,२ फरार,७ दुचाकीसह २ लाख,७० हजारांचा मुद्देमाल जप्त;LCB ची मोठी कारवाई

**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखा(LCB)पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ३ फेब्रुवारी रोजी सिंदेवाही पोलीस स्टेशन हद्दीत छापा टाकून जुगार खेळणाऱ्या १२ जणांनवर कारवाई करून सिंदेवाही पो.स्टे.येथे संबंधित कलमान्वये गुन्ह्याची नोंद केली आहे.१० जणांना ताब्यात घेण्यात आले असून २ जण फरार झाले आहे.सदर गुन्ह्यात डावावरील १ हजार,५००,आरोपींच्या अंगझडतीत १९ हजार,२००,ताश किंअं.५० रु.आणि ७ दुचाकी किंअं.२ लाख,७० हजार,७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



सलिम चांद खान पठाण वयवर्ष ३०,दिपरत्न अंबादास खोब्रागडे वयवर्ष ३१,जावेद कादर खान पठाण वयवर्ष ३२,अरुण प्रभाकर नन्नावरे वयवर्ष ५०,संतोष तुळशीराम नान्हे वयवर्ष ४२,पांडुरंग देवाजी पुसतोडे वयवर्ष ४५,पुरुषोत्तम मणिराम बांबोळे वयवर्ष ५०,प्रकाश कवडू आदे वयवर्ष ३५,सारंग जगन्नाथ निमगडे वयवर्ष ४७,जितेंद्र महादेव करकाडे वयवर्ष ४४(सर्व रा.सिंदेवाही)यांना अटक करण्यात आली असून निखील राऊत रा.नांदेड ता.नागभीड आणि एका दुचाकी चालक फरार झाला असून यांचा शोध सुरू आहे.गुन्ह्याची पुढील तपास सिंदेवाही पोलीस करीत आहे.सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनात डउइ चे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोहवा.जयंत चुनारकर,अजित शेंडे,प्रदीप मडावी,नितेश महात्मे आणि गजानन मडावी सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

# वाड्यामध्ये महाराष्ट्राचे लोकनेते स्व.अजित दादा पवार यांच्या शोकसभेचे आयोजन




**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर | प्रतिनिधी**

वाडा – महाराष्ट्राचे लोकनेते स्व. अजितदादा पवार यांची सर्वपक्षीय श्रद्धांजली सभा वाडा येथील पटारे मंगल कार्यालय येथे आज गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी पार पडली. यावेळी सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वाडा नगराध्यक्षा रीमा गंधे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल पाटील, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप पवार, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष निखिल पष्टे, सुरेश पवार, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नीलेश गंधे, राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्षा रोहिणी शेलार, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस मिलिंद देशमुख, आशिष मोरे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष स्वप्नील ठाकरे, शिवनेना (उबाठा) तालुका प्रमुख नीलेश पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते विजय औसरकर, शिवसेनेचे मनीष पाटील, राष्ट्रवादीचे युवक तालुका सचिव रूपेश पाटील यांनी याप्रसंगी अजितदादांच्या आठवणी जागवल्या. सुरुवातीला राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष जयेश शेलार यांनी प्रास्ताविक केले तर राजेश पाटील सर यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी सर्व पक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२६ ची नूतन कार्यकारणी जाहीर

## विजय जंजाळ अध्यक्ष;रमेश सोनवणे सचिव,अमोल शिंदे कार्याध्यक्ष

**दैनिक वादळ वार्ता**
**भोकरदन | प्रतिनिधी**

भोकरदन सार्वजनिक शिवजयंती उत्सव २०२६ च्या अनुषंगाने लोकमान्य वाचनालय येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली.गतवर्षीच्या शिवजयंती उत्सवाचा सखोल लेखाजोखा सुरेश तळेकर यांनी मांडला,तर मावळते अध्यक्ष रामचंद्र गायके यांनी मागील वर्षाचा सविस्तर अहवाल सर्वांसमोर सादर केला.या बैठकीत सर्वानुमते शिवजयंती उत्सव समिती २०२६ साठी नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली.

अध्यक्षपदी : विजय जंजाळ
सचिवपदी : रमेश सोनवणे
कार्याध्यक्षपदी : अमोल शिंदे
उपाध्यक्षपदी : मजदत खान
कोषाध्यक्ष : कदीर बापू
प्रसिद्धीप्रमुख : आप्पासाहेब जाधव

या बैठकीस मार्गदर्शक म्हणून सुरेश तळेकर,विष्णू गाढे, बबन शिंदे, कदीर बापू व रामचंद्र गायके उपस्थित होते.तसेच भगवान देठे, वामन पाटील जंजाळ (माजी सैनिक), कैलास साबळे, माजी सैनिक रवींद्र दांडगे, नारायण सोन्नी यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवीन कार्यकारणीचे सर्वांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वांनी एकत्र येऊन शिवजयंती उत्सव २०२६ विविध उपक्रमांनी व भव्यदिव्य स्वरूपात साजरा करण्याचा संकल्प केला.



# लिंबागणेश तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध डॉ. गणेश ढवळे यांची निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज गुरुवार, दिनांक ०५ रोजी सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी सभेत विविध विषयांचे सविस्तर वाचन करून ग्रामस्थांना माहिती दिली.

या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच बालासाहेब जाधव यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्या नावाची अधिकृत शिफारस केली, तर सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी त्यास अनुमोदन दिले. ग्रामस्थांनी एकमुखाने त्यांच्या नावाला पाठिंबा दिला.

निवडीनंतर सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. गणेश ढवळे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत गावातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी यापूर्वी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले.यावेळी पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी, गावातील शांतता, सलोखा आणि सौहार्द वाढविण्यासाठी डॉ. गणेश ढवळे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाने माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू केलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत, गावातील वाद–विवाद गावपातळीवरच सामोपचाराने मिटवण्यासाठी तंटामुक्ती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे किरकोळ वाद, जमीन वाद, कौटुंबिक तंटे तसेच इतर सामाजिक वाद पोलिस प्रशासन व ग्रामस्थांच्या सहभागातून सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या निवडीनंतर बोलताना डॉ. गणेश ढवळे यांनी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी दाखवलेला विश्वास सर्वांच्या सहकार्याने सार्थ करेन, अशी ग्वाही दिली. गावातील शांतता टिकवणे, तंटे कमी करणे आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करणे, हे आपले प्रमुख उद्दिष्ट असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे,शंकर वाणी, ॲड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, अक्षय वाणी,बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड,मोहन कोटुळे, केशव गिरे, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहाय्यक अशोक लोखंडे,विष्णु गर्जे, आसराजी वीर,अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, यमुना आबदार, प्रतिक्षा शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे संस्कार समाजात रुजवावेत-प्राचार्य डी.डी.राऊत

## तुलसी कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा 'निरोप समारंभ' उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

निरोप समारंभाकडे केवळ एक निरोप म्हणून न पाहता, त्याकडे 'रोप समारंभ' म्हणून पाहावे. इथून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी महाविद्यालयाच्या संस्कारांचे एक रोप आहे, जे समाजाच्या विविध क्षेत्रांत जाऊन या संस्कारांचे रोपण करेल, असे प्रेरणादायी प्रतिपादन तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, बीड येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार (दि.५) रोजी आयोजित निरोप समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, प्रा.संजय खाडे, डॉ.विकास वाघमारे आणि आयु.माधुरी घुंबरे यांची उपस्थिती होती.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. राऊत पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये साधारणपणे तीन प्रकार आढळतात. काही विद्यार्थी अत्यंत हुशार असतात, काही मध्यम स्तरातील असतात, तर काही विद्यार्थी अभ्यासात मागे राहणारे असतात. मात्र, यश केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून नसून मेहनत, सातत्य आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यावर अवलंबून असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही गुण दडलेले असतात. त्या गुणांची ओळख करून त्यावर सातत्याने मेहनत घेतल्यास प्रत्येक विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होऊ शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. मेहनत, शिस्त आणि ज्ञान यांच्या जोरावरच यशाचा मार्ग सुकर होतो, असे त्यांनी सांगितले. प्राचार्य प्रकाश ढोकणे यांनी बारावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारे असल्याचे सांगत गुणवंत होण्यासाठी सर्वांगीण विकास आवश्यक असल्यावर भर दिला.याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. काहींनी मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली, तर काहींनी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समारंभाची रंगत अधिकच वाढली. अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात हा निरोप सोहळा पार पडला.



## कौठा येथे श्री संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता
**कौठा । प्रतिनिधी**

कौठा ता. कंधार येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही श्री संत रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली जयंती मंडळाचे अध्यक्ष मारोती हराळे यांनी नांदेड गुरुद्वाराचे साधु संत यांना आमंत्रीत केले होते त्यांच्या हस्ते विधीवत पूजा व आरती करण्यात आली त्यावेळी कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री संजय देशमुख सरपंच प्रतिनिधी शिवकुमार देशमुख चेअरमन प्रताप देशमुख तंटामुक्ती अध्यक्ष संभाजी देशमुख पत्रकार प्रभाकर पांडे भाजपचे शिवसांब देशमुख माजी सरपंच व्यंकटराव घोरपडे सतिश देशमुख पप्पू देशमुख यादव हराळे दिगंबर हराळे हाणमंत हराळे श्यामराव शिराढोणे भिमराव शिरोढोणे रोहीदास शिराढोणे आम्रत हराळे कोडींबा हराळे जिवन हराळे व्यंकट हराळे भगवान हराळे लालबा वाघमारे गणपत बोमनाळे सखा शिराढोणे विठ्ठल हराळे रामदास हराळे पंढरीनाथ कांबळे सह समस्त गावकरी व महिला उपस्थित होते.

# वैरागड येथील प्रितम बनकर याची उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून निवड

दैनिक वादळ वार्ता
**वैरागड । प्रतिनिधी**

आरमोरी येथील महात्मा गांधी महाविद्यालय मार्फत आरमोरी तालुक्यातील सायगाव येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरात वैरागड येथील प्रितम विनोद बनकर याची उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून निवड करण्यात आली.

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यामधील सायगाव येथे महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी यांच्या मार्फत २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ७ दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रमांमध्ये उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल वैरागड येथील प्रितम विनोद बनकर यांची 'उत्कृष्ट स्वयंसेवक' म्हणून निवड करण्यात आली. शिबिर दरम्यान स्वच्छता अभियान, श्रमदान, सामाजिक जनजागृती, गावविकास संबंधित उपक्रमांमध्ये प्रितम बनकर याने सक्रिय सहभाग घेत उल्लेखनीय कार्य केले. त्याच्या या कार्याची दखल घेत शिबिराच्या समारोप प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते त्याचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी प्रितम बनकर यांच्या कार्याचे कौतुक करत राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये समाजभान व जबाबदारी निर्माण करणारी चळवळ असल्याचे मत व्यक्त केले. या सन्मानामुळे स्वयंसेवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून भविष्यातही सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालय संस्थेचे सचिव मनोज वनमाळी, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, दिपक बेहरे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. कढव, रा.से.यो. अधिकारी प्रा. सुनंदा कुमरे, ग्रामसचिव विजय पत्रे, सरपंच शीतल कोल्हे, पोलिस पाटील दिलीप हारगुळे तसेच संस्थेचे सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वैरागड ग्रामपंचायतला मिळाली थंड पाण्याची मशीन

दैनिक वादळ वार्ता
**वैरागड । प्रतिनिधी**

येथील ग्रामपंचायतीने घेतलेले थंड पाण्याचे आरो मशीन बिघडल्याने श्री भंडारेश्वर देवस्थान पेट्रोलियम यांचे मालक प्रदीप मोटवानी यांनी आरो मशीनची व्यवस्था करून दिली.

आरमोरी तालुक्यात वैरागड ग्रामपंचायत सर्वात मोठी म्हणून समजल्या जाते. सन-२०१६-१७ मध्ये शासनाच्या १४ वित्तीय आयोग मार्फत नागरिकांना थंड पाणी मिळण्यासाठी वैरागड ग्रामपंचायतीने आरो मशीन घेतले. मशीन खराब झाल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली. नागरिकांची समस्या पाहता वैरागड श्री भंडारेश्वर देवस्थान पेट्रोलियम यांचे मालक प्रदीप मोटवानी यांनी वैरागड ग्रामपंचायतीला आरो मशीनची व्यवस्था करून दिली.

यावेळी ग्रामपंचायत सरपंचा संगीता पेंदाम, उपसरपंच भास्कर बोडणे, सेवानिवृत्त आरोग्य सेवक खुशाल पेंदाम, ग्रामपंचायत सदस्य सत्यदास आत्राम, आदेश आकरे, चंद्रविलास तागडे, संगीता मेश्राम, मनिषा खरवडे, प्रतिभा बनकर, दिपाली ढेंगरे, रेखा भैसारे, ग्रामपंचायत लिपिक सुरेश सहारे, संगणक चालक प्रकाश नागोसे, विद्युत कर्मचारी अनिल आकरे आणि परिचर विद्या कुलसंगे उपस्थित होते.



# पेंटीपाका येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षका कडून पहिलीच्या विद्यार्थ्यास अमानुष मारहाण

## जखमी मुलाच्या उपचारासाठी सागर मूलकला यांची आर्थिक मदत

दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तालुक्यातील पेंटीपाका गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या इयत्ता पहिलीतील उमेश राजेश काळबांडे (वय ८) या अल्पवयीन विद्यार्थ्याला ३ जानेवारी रोजी शाळेच्या वेळेत शिक्षक मधुकर बट्टीवार यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या मारहाणीत उमेश या मुलगा जखमी झाला होता.

या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे सिरोंचा तालुका अध्यक्ष तसेच पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर मूलकला यांनी तत्काळ जखमी मुलाच्या घरी भेट देऊन घटनेची माहिती घेतली आहे.जखमी मुलाचे कुटुंब अत्यंत गरीब असून उपचारासाठी त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात घेऊन सागर मूलकला यांनी स्वतः पुढाकार घेत जखमी मुलाच्या उपचारासाठी आर्थिक मदत केली..यावेळी त्यांनी संबंधित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे ठाम आश्वासन दिले.या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे कार्यकर्ते उपस्थित होते.या घटनेमुळे शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून संबंधित शिक्षकावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.



# राष्ट्रीय आरोग्य अभियान एचबिटी एनएचएम दवाखान्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे दुर्लक्ष

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) तसेच HBT हृदय सम्राट बाळासाहेब दवाखाना अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच NHM अंतर्गत समायोजन आदेशास होणारा विलंब,नियमित वेतन न मिळणे तसेच अनेक महिन्यांपासून वेतन प्रलंबित राहिल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे,त्यांच्या समायोजना संदर्भातील शासन निर्णय १४ मार्च २०२४ रोजी निर्गमित झाला होता.मात्र या निर्णयाला आता जवळपास दोन वर्षे पूर्ण होत असतानाही अद्याप समायोजनाचे आदेश प्रत्यक्षात आलेले नाहीत.या विलंबामुळे संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढली असून,त्यांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.त्याचप्रमाणे छक्ब् अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याला मोठ्या प्रमाणात विलंबाने मिळत असल्याची तक्रार आहे.अनेक कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार न मिळाल्याने घरखर्च, कर्जहप्ते,मुलांचे शिक्षण व दैनंदिन गरजा भागवताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे क्ध्ढ हृदय सम्राट बाळासाहेब दवाखाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काही जिल्ह्यात ४ ते ५ महिन्यांपासून वेतन पूर्णपणे प्रलंबित आहे.आरोग्य सेवेसारख्या अत्यावश्यक क्षेत्रात काम करूनही वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांची मानसिक व आर्थिक अवस्था ढासळत चालल्याचे चित्र आहे.

संघटनांच्या वतीने शासनाकडे स्पष्ट मागणी करण्यात आली आहे की, NHM् अंतर्गत समायोजनास ज्या पदांसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता नाही जे कि पहिलेच ते ते पद आहेत जसे कि - NM,GNM्,फार्मासिस्ट,लॅब टेक्निशियन यांसारख्या टेक्निकल पदांचे समायोजन तात्काळ करण्यात यावे व त्याबाबतचे आदेश त्वरित निर्गमित करावेत व जे काही रिक्त पदे इतर जाहिरातीद्वारे भरण्यात येत आहे ते न भारतात पाहिले छक्ब् चे कर्मचारी यांचे समायोजनाची प्रक्रिया पुर्ण पार पडावे व मगच रिक्त जागा भरावे. तसेच गेल्या दरमहा ५ तारखे पर्यंत वेतन होणे बाबत मा. आरोग्य मंत्री तसेच आरोग्य विभागाचे पत्र असताना सुद्धा गेल्या वर्षभरापासून होत असलेला वेतनाचा विलंब तातडीने दूर करून सर्व प्रलंबित वेतन तत्काळ अदा करावे.या मागण्या त्वरित मान्य न झाल्यास नाईलाजास्तव संबंधित संघटनेच्या वतीने 'संघर्ष महाराष्ट्र राज्य युनियन च्या बॅनरखाली तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.सध्या समस्त कंत्राटी कर्मचारी मानसिक तणावाखाली असून, यातच असंख्य कंत्राटी कर्मचारी यांचे दुःखद निधन झाले आहे त्यांना एक रुपयाचा शासनाकडून काही सहकार्य नाहीं तरी शासनाने या संवेदनशील प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077